# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०२/०८/२०२६

## कोणताही ठोस पुरावा  नसताना कौशल्यपूर्ण तपास करून खूनाच्या गंभीर गुन्ह्याचा यशस्वी उलगडा, २ आरोपी अटक , स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री. अंकुश माने, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कोणताही ठोस पुरावा नसताना कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील खूनाच्या गंभीर गुन्ह्याचा यशस्वी उलगडा करून दोन आरोपींना अटक केली आहे.

दिनांक २०/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मांगली शिवारात अनिल धानोजे यांच्या विहिरीजवळील जंगल परिसरात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. सदर घटनेबाबत कळमेश्वर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. शवविच्छेदन अहवालात मृत्यू हा नैसर्गिक नसून खून झाल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.कळमेश्वर पोलीसांसह स्थानिक गुन्हे शाखेने सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला.

मृतकाचे चेहरा पुर्णपणे कुजलेला होता.तपासादरम्यान तांत्रिक पुरावे आणि कौशल्यपुर्ण तपास करून सदर मृतकाची ओळख अतुल चंद्रकांत तिवारी, वय २५ वर्षे, रा. भीमनगर, इसासनी रोड, लता मंगेशकर हॉस्पिटलजवळ, हिंगणा रोड, नागपूर अशी असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने निष्पन्न केली.तसेच एमआयडीसी पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे मृतक बेपत्ता असल्याबाबत दिनांक २२/०७/२०२६ रोजी तक्रार दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सदर गुन्ह्याच्या तपासात प्रारंभी कोणताही ठोस पुरावा, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अथवा कोणत्याही प्रकारचा धागादोरा उपलब्ध नव्हता. असे असतानाही स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती तसेच इतर उपलब्ध बाबींचे बारकाईने विश्लेषण करून तपासाची दिशा निश्चित केली. सखोल तपासात योगेश दीपक पोपळघट हा मृत्युपुर्वी मृतका सोबत असल्याचे निष्पन्न झाले. त्याला ताब्यात घेत त्याच्याकडे कौशल्यपूर्ण विचारपूस केली असता मनोज बुद्धेश्वर नारनवरे याच्यासह मिळून दिनांक १७/०७/२०२६ रोजी दोघांनी संगनमताने मृतकाचा खुन केल्याची माहिती प्राप्त झाली. आरोपी मृतकाच्या परिचयाचे असल्याचे निष्पन्न झाले. तसेच मृतक व आरोपी यांच्यामध्ये असलेल्या पैशांच्या वादातून दोन्ही आरोपींनी संगनमताने मृतकाचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले.त्यानुसार आरोपी क्र. १) योगेश दीपक पोपळघट, वय २८ वर्षे, रा. जयताळा, नागपूर यास जयताळा, नागपूर येथून तर आरोपी क्र. २) मनोज बुद्धेश्वर नारनवरे, वय २८ वर्षे, रा. सिल्लेवाणी, ता. पांढुरणा, जि. पांढुरणा, मध्य प्रदेश यास हिंगणा, नागपूर येथून ताब्यात घेऊन सखोल चौकशी करण्यात आली. चौकशीत गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने दोन्ही आरोपींना दिनांक ०२/०८/२०२६ रोजी अटक करण्यात आली.कोणताही ठोस पुरावा अथवा धागादोरा उपलब्ध नसताना कौशल्यपूर्ण तपासाच्या करून सदर गंभीर खूनाच्या गुन्ह्याचा यशस्वी उलगडा करण्यात आला.

TheHitavada
Nagpur City Line | 2026-08-03 | Page- 2
ehitavada.com

# Rural Police solve blind murder case: Man killed over Rs 3,000 loan

- During questioning, the accused allegedly admitted that Atul (deceased) had borrowed Rs 3,000 from them. He had not returned the money for the past two months despite repeated demands

■ **Staff Reporter**

A 25-YEAR-OLD man was murdered by friends over an unpaid loan of just Rs 3,000. The Nagpur Rural Local Crime Branch solved the blind murder case and arrested two accused. Police cracked the case despite having no eyewitnesses or direct evidence.

The victim was identified as Atul Chandrakant Tiwari (25), a resident of Bhim Nagar on Hingna Road. His decomposed body was found on July 20 in a forested area near a well at Mangli under Kalmeshwar police station limits.

At first, police registered an accidental death case. Later, the post-mortem report confirmed that it was a murder. A case was then registered under Section 103(1) of the Bharatiya Nyaya Sanhita.

The victim's face was badly decomposed. His identity was established with the help of technical evidence. Police also found that a missing person complaint had been filed at MIDC Police Station on July 22.

The investigation was difficult. There were no eyewitnesses.

There were no clear clues. The Local Crime Branch studied CCTV footage, analysed technical evidence and collected confidential information. The investigation led police to Yogesh Deepak Popalghat (28) of Jaitala and Manoj Buddheshwar Narnavre (28), originally from Sillevani near Pandhurna and currently staying in Hingna.

During questioning, the accused allegedly admitted that Atul had borrowed Rs 3,000 from them. He had not returned the money for the past two months despite repeated demands. Police said the dispute over the loan led to the murder. The two accused allegedly planned the crime and killed Atul on July 17. Both accused were arrested on August 2. The operation was carried out under the guidance of Sr Superintendent of Police Dr Harssh A Poddar, Additional Superintendent of Police Anil Maske and Local Crime Branch Police Inspector Ankush Mane and his team.

Powered by Bharati Web

पुण्य नगरी

# पैशांच्या वादातून तरुणाचा खून करीत फेकला मृतदेह




**▮ स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासात बाब उघड**

**▮ दोन आरोपींच्या आवळल्या मुसक्या**

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**कळमेश्वर :** स्थानिक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मांगली शिवारात २० जुलैला अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळला होता. शवविच्छेदनात खून झाला असल्याची बाब उघड झाली. स्थानिक गुन्हे शाखेने मोठ्या शिताफीने या खुनाचा उलगडा केला असून दोन आरोपींना रविवारी( २ ऑगस्ट )ताब्यात घेण्यात आले. पैशाच्या वादातून हा खून झाल्याची बाब तपासातून पुढे आली आहे.



अनिल धानोजे यांच्या शेताजवळील विहिरीजवळ हा मृतदेह आढळला. सुरुवातीला कळमेश्वर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. मात्र, शवविच्छेदन अहवालात मृत्यू हा नैसर्गिक नसून खून असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला. मृतदेहाचा चेहरा पूर्णपणे कुजल्याने ओळख पटविणे मोठे आव्हान होते. तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास करीत स्थानिक गुन्हे शाखेने मृतकाची ओळख अतुल चंद्रकांत तिवारी (२५, रा. भीमनगर, इसासनी रोड, नागपूर) अशी पटविली. एमआयडीसी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार असल्याचेही तपासात उघड झाले. तपासात योगेश दीपक पोपळघट(रा. जयताळा, नागपूर) हा मृत्यूपूर्वी अतुलसोबत असल्याचे निष्पन्न झाले. त्याची चौकश केली असता मनोज बुद्धेश्व नारनवरे(रा. सिल्लेवानी, त पांढुर्णा, मध्यप्रदेश) याने संगनम करून १७ जुलैला पैशांच्या वादात अतुलचा खून केल्याची कबुल दिली. त्यानंतर योगेश व मनो या दोघांना ताब्यात घेण्यात आले जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दा अपर पोलीस अधीक्षक अनि मस्के यांच्या मार्गदर्शनात स्थानि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्ष अंकुश माने यांच्या नेतृत्वात ह कारवाई केली.

Nagpur Edition
Aug 03, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com